प्रेस नोट दि. २६/०७/२०२३

# पनवेल शहर पोलीस ठाणे

## बलात्काराच्या गंभीर गुन्हयाचा तपास ०४ दिवसांच्या आत पुर्ण करुन गुन्हयातील आरोपी विरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल

---

पनवेल शहर पोलीस ठाणे येथे महिला तक्रारदार दि. ०९/०७/२०२३ रोजी सायंकाळी पोलीस ठाण्यात हजर झाल्या व इसम नामे अनुज सुनिल वेदक, वय २९ वर्षे याने त्यांचेशी हॅपन डेटिंग ॲपवरुन ओळख करुन त्यांना दि. ११/०८/२०२२ रोजी पनवेल येथे भेटण्यास बोलावुन पनवेल येथील वृंदावन लॉजवर घेवुन जावून तसेच दि. १२/०८/२०२२ रोजी ते दि. १४/०८/२०२२ रोजी लोणावळा येथील एका लॉजवर घेवुन जावुन त्यांचेशी लग्न करणार असल्याचे सांगुन, त्यांचे सोबत जबरदस्तीने वारंवार शारीरीक संबंध करुन त्यांना गर्भवती केले. त्यानंतर त्यांचेशी लग्न न करता त्यांची व बाळाची जबाबदारी घेण्यास नकार देवुन शिवीगाळी व दमदाटी केली अशी माहिती सांगितली.

सदरची माहिती मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे यांनी मा. पोलीस उपआयुक्त, परि ०२, पनवेल यांना दिली असता मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ ०२, पनवेल व मा. सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग यांचे सुचनेनुसार तसेच सहा. पोलीस निरीक्षक वृषाली पवार व पोना/२८६३ प्रविण मेथे असे तपास पथक तयार करण्यात येवून त्यांना मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या होत्या. वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे सहा. पोलीस निरीक्षक वृषाली पवार व पोना/२८६३ प्रविण मेथे यांनी तक्रारदार यांची तात्काळ फिर्याद नोंद करुन पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ४०७/२०२३ भादवि कलम ३७६(२)(एन), ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल केला.

सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर नमुद पथकाने गुन्हयातील आरोपी अनुज सुनिल वेदक, वय २९ वर्षे याचे बाबत तपास केला असता तो मुळचा मु.पो. पालगड, ता. दापोली, जि. रत्नागिरी येथील असुन सध्या रा. सानवी मार्हल्स, रुम नं. ६०५, म्हाळुंगे, चाकण, पुणे येथे राहत असल्याचे समजले. मिळालेल्या माहितीचे आधारावरुन तपास पथकाने आरोपीत यास तात्काळ ताब्यात घेवुन सदर गुन्हयात अटक केली. सदरच्या गंभीर गुन्हयातील आरोपीत याचेकडे तपास केला असता त्याने पनवेल व लोणावळा येथील लॉजवर गुन्हा केला असल्याचे सांगितल्याने तेथे जावून पुरावे प्राप्त करुन पंचनामे करण्यात आले. तसेच गुन्हयातील फिर्यादी व आरोपी यांची गुन्हयाचे अनुषंगाने वैद्यकिय तपासणी करुन फिर्यादी, आरोपी व बाळाचे डी.एन.ए. सॅम्पल काढुन घेवून न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलिना, मुंबई येथे पाठविण्यात आले. सदर गुन्हयाचा अविरत चार दिवस तपास करुन यर्थथ किटचा वापर करुन नमुद पाथकाने आरोपी विरुद्ध पुरावे प्राप्त करुन ०४ दिवसांत मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

---